# <u>महावितरण जाहिरात क्रमांक ०५/२०१९</u>

## <u>"उपकेंद्र सहाय्यक" या पदाची दि. २५/०८/२०१९ रोजी होणारी ऑनलाईन परीक्षा</u>

१. महावितरण जाहिरात क्र. ५/२०१९ अन्वये कंत्राटी पद्धतीवर "उपकेंद्र सहाय्यक" पदे भरण्याकरिता माहे जुलै, २०१९ मध्ये जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख २६/०७/२०१९ अशी होती.

२. सदर जाहिरातीच्या अनुषंगाने अर्ज प्राप्त झालेल्या सर्व उमेदवारांची वस्तुनिष्ठ स्वरुपाची (Objective Type) ऑनलाईन क्षमता **<u>चाचणी दि. २५/०८/२०१९ (रविवार) रोजी घेण्यात येत आहे.</u>** सदर परीक्षेचे माध्यम मराठी राहील याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

३. उमेदवाराच्या आवेदनाच्या संदर्भात उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या अर्जामधील माहितीच्या आधारे उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेस बसण्यास अनुमती देण्यात येत आहे. तथापि, निवड झालेल्या उमेदवारांच्या अर्जाची छाननी नेमणूकीपूर्वी करण्यात येईल.

४. ऑनलाईन पध्दतीने सादर केलेल्या अर्जामधील सर्व माहितीची सत्यता तपासण्यासाठी आवश्यक कागदपत्रांचा पुरावा कंपनीचे सूचनेनुसार भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर सादर करणे आवश्यक राहील. परीक्षेनंतर कोणत्याही टप्प्यावर कागदपत्रांची पडताळणी करण्यात येईल. अशा पडताळणीच्यावेळी उमेदवाराने अर्जाद्वारे केलेल्या दाव्याप्रमाणे विहित कालावधीत आवश्यक पुरावा/ कागदपत्रे सादर न केल्यास उमेदवारी रद्द केली जाईल.

५. ऑनलाईन अर्ज सादर केलेल्या सर्व उमेदवारांनी त्यांना दिलेल्या User ID व Password आधारे खाली उपलब्ध करुन दिलेल्या लिंकवरुन प्रवेशपत्र डाऊनलोड करावे. तसेच परीक्षेच्या स्वरुपाबद्दल माहिती/सूचना देणारी पुस्तिका (Information Handout) खाली दिलेली आहे. सदर माहिती पुस्तिका व प्रवेशपत्रामध्ये नमूद केलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करावे.

६. उमेदवारांनी प्रवेशपत्रामध्ये नमूद केलेल्या परीक्षास्थानी दिलेल्या दिवशी आणि वेळी परीक्षेस उपस्थित रहावे. परीक्षा कक्षामध्ये प्रवेशपत्रामध्ये विहित केलेल्या वेळेनंतर कोणत्याही परिस्थितीत उमेदवारांना प्रवेश दिला जाणार नाही.

७. सदर निवड प्रक्रिया मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल झालेल्या याचिका क्रमांक २११६/२०१३, २१४७/२०१३ आणि २३२५/२०१३, मा. औद्योगिक कामगार न्यायालय याचिका क्रमांक ४८/२०१२ व मा. उच्च न्यायालय मुंबई, औरंगाबाद खंडपीठ येथे दाखल झालेल्या याचिका क्रमांक २२३३८/२०१९, ९६७३/२०१९ तसेच मा. उच्च न्यायालय मुंबई, नागपूर खंडपीठ येथे दाखल झालेल्या याचिका क्र. ७०३८/ २०१८, ५३१०/२०१९ च्या आदेशाच्या/निर्णयाच्या अधीन राहून करण्यात येत आहे.

८. उमेदवारांच्या पूर्ण नावासहीत त्यांचे ऑनलाईन परीक्षेचा रोल नंबर, जातीचा प्रवर्ग, रजिस्ट्रेशन नंबर, परीक्षा स्थळ व परीक्षेची वेळ इत्यादी माहिती खाली नमूद केलेल्या लिंकवर (ALFA LIST) तसेच प्रवेशपत्र (Call Letter) उपलब्ध आहे.

MSEDCL